IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका

**डॉ. श्रेया संजीव दाणी**

इतिहास विभाग प्रमुख, राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, लांडेवाडी,भोसरी, पुणे -३९

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*सामाजिक परिवर्तन*
*महिला*

**ABSTRACT**

भारतीय समाजाच्या विकासात व परिवर्तनात महिलांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. पारंपारिक समाज व्यवस्थेत महिलांची भूमिका मुख्यतः घरगुती कर्तव्यांपुरती मर्यादित होती. परंतु शिक्षण, तंत्रज्ञान, कायदे, आर्थिक स्वतंत्रता आणि सामाजिक जागृती यांच्या माध्यमातून महिलांनी सामाजिक परिवर्तनाला नवे आयाम दिले आहेत. त्यांनी शिक्षण, उद्योगधंदे, राजकारण, प्रशासन, आरोग्य, विज्ञान, साहित्य, कला क्रिडा इ. सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. या संशोधनाचा मुख्य उद्देश सामाजिक परिवर्तन प्रक्रियेत महिलांचे योगदान, त्यांचे सक्षमीकरण, आव्हाने आणि भावी दिशा यांचा अभ्यास करणे हा आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Dani, S. S. (2025). *सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **613–617**.

- **प्रास्ताविक:**

भारतीय समाजाच्या विकासात व परिवर्तनात महिलांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. पारंपारिक समाज व्यवस्थेत महिलांची भूमिका मुख्यतः घरगुती कर्तव्यांपुरती मर्यादित होती. परंतु शिक्षण, तंत्रज्ञान, कायदे, आर्थिक स्वतंत्रता आणि सामाजिक जागृती यांच्या माध्यमातून महिलांनी सामाजिक परिवर्तनाला नवे आयाम दिले आहेत. त्यांनी शिक्षण, उद्योगधंदे, राजकारण, प्रशासन, आरोग्य, विज्ञान, साहित्य, कला क्रिडा इ. सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. या संशोधनाचा मुख्य उद्देश सामाजिक परिवर्तन प्रक्रियेत महिलांचे योगदान, त्यांचे सक्षमीकरण, आव्हाने आणि भावी दिशा यांचा अभ्यास करणे हा आहे.

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील विचार, मूल्ये, परंपरा, संस्कृती, आर्थिक रचना आणि जीवन शैलीमध्ये दीर्घकालीन व्यापक आणि सकारात्मक बदल होय. या परिवर्तनात पुरुषांप्रमाणेच महिलांचाही सहभाग महत्वाचा असतो. भारतीय संस्कृतीत स्त्रीला शक्ती, माता, जननी असे गौरवपूर्ण स्थान दिले गेले आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र महिलांना अनेक बंधने, असमानता व दडपण सहन करावे लागले. स्वातंत्र्यसंग्राम, समाजसुधारणा, शिक्षणप्रसार, स्त्री हक्क चळवळी आणि संविधानिक अधिकारांनी महिलांच्या स्थितीत मोठे बदल घडविले आहेत.

- **संशोधनाची उद्दिष्टे:**

१. सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात महिलांची पारंपारिक आणि आधुनिक भूमिका विशद करणे.
२. शिक्षण, रोजगार, राजकारण, आरोग्य आणि आर्थिक क्षेत्रातील महिलांच्या सहभागाचे विश्लेषण करणे.
३. महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देणारे घटक व अडथळे शोधणे.
४. सामाजिक परिवर्तनात महिलांची भविष्यकालीन योगदान व शक्यता दर्शविणे.

- **साहित्य समीक्षा :**

भारतीय समाजातील महिलांच्या भूमिकेवरील अनेक अभ्यासांमध्ये खालील मुद्दे ठळकपणे मांडले गेले आहेत.

१. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाला नवी दिशा दिली ज्यामुळे सामाजिक परिवर्तनाची मूळे घट्ट रोवली गेली.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात समान हक्कांची हमी दिली, ज्यामुळे महिलांच्या जीवनात क्रांतीकारक बदल घडले.
३. अनेक समाजशास्त्रज्ञांच्या मते, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन व तंत्रज्ञान ही सामाजिक परिवर्तनाची मुख्य साधने आहेत.
४. विविध संशोधनानुसार, महिलांच्या शिक्षणातील वाढ ही समाजाच्या प्रगतीशी थेट संबंधित आहे.

- **सामाजिक परिवर्तनाची संकल्पना:**

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील जुनाट, अव्यवहार्य प्रथा, परंपरा, रितीरिवाज, मूल्ये आणि सामाजिक रचनेत काळानुसार होणारा सकारात्मक बदल होय. हा बदल अचानक होत नाही, तर विविध घटकांच्या प्रभावातून तो हळूहळू होत असतो.

शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, सामाजिक जागृती, आर्थिक प्रगती, राजकीय व्यवस्था, कायदे, धोरणे, संस्कृतीतील बदल, स्त्री पुरुष समानता या सर्व घटकांचा प्रभाव सामाजिक परिवर्तनावर होतो. या सर्व घटकांमध्ये महिलांचा सहभाग वाढला की, सामाजिक परिवर्तन अधिक वेगाने आणि सकारात्मक स्वरूपात दिसते. कारण महिला समाजाच्या अर्ध्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात आणि महिला या कुटुंब व समाजाच्या संस्काराच्या मुख्य दुवा किंवा वाहक असतात. सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण मानली जाते. कारण घरातील एक स्त्री कुटुंबाचे परिवर्तन करू शकते. महात्मा फुले यांच्या मतानुसार, एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शकेल. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. संपूर्ण कुटुंबाला बांधण्याचे काम स्त्रिया करताना दिसतात. म्हणून सामाजिक परिवर्तनात स्त्रीची भूमिका अनन्यसाधारण मानली जाते.

- **इतिहासातील महिलांची भूमिका:**

भारतामध्ये प्राचीन काळामध्ये महिलांना शिक्षण व ज्ञानाचा अधिकार होता. प्राचीन भारतामध्ये गार्गी, मैत्रेयी, अपाला, लोपामुद्रा यासारख्या स्त्रियांनी वेद उपनिषदांच्या काळामध्ये समाजाच्या बौध्दिक विकासात मोठा वाटा उचलला. या सर्व विद्वान महिलांनी वेद, उपनिषद काळामध्ये मंत्र व सुक्ते लिहिली.

परंतु मध्ययुगामध्ये मात्र महिलांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला. मध्ययुगात आक्रमणे, सामाजिक प्रथा, पितृसत्ताक पध्दती, धार्मिक अंधश्रध्दा यामुळे महिलांची परिस्थिती ढासळू लागली. स्त्री शिक्षण बंद झाले. पडदा पध्दती, बालविवाह, सती प्रथा अशा अनेक वाईट प्रथा परंपरांनी स्त्रियांना चौकटीत बांधण्यात आले.

याच परिस्थितीत आधुनिक काळामध्ये १९ व्या शतकातील समाजसुधारक व सुधारकी विचार असलेल्या महिलांनी अनेक मोठ्या चळवळी उभ्या केल्या. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची ज्ञानपताका समाजामध्ये उभी केली. स्त्री शिक्षणाची सुरुवात करून हजारो वर्षांची अंध:कारमय परिस्थितीमध्ये अभूतपूर्व बदल केला. त्याचबरोबर भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाई, कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, डॉ. ॲनी बेझंट या व अशा अनेक महिलांनी पराक्रम, सामाजिक सुधारणा, राजकीय नेतृत्व, शिक्षण व स्वराज्य या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याचे दिसते. या महिलांच्या योगदानामुळे समाज महिलांकडे एका नव्या दृष्टिकोनातून पाहू लागला. त्यामध्ये सामाजिक परिवर्तनाची बीजे रोवली गेली. समाजामध्ये बदल, परिवर्तन होणे आवश्यक होते.

स्वातंत्र्य लढ्यामध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढण्याची ताकद महिलांनी दाखवून दिली. मवाळवाद, जहालवाद, क्रांतिकारी, गांधीवाद अशा अनेक चळवळींमध्ये महिलांचा सहभाग उल्लेखनीय होता. प्रसंगी शस्त्र हाती घेऊन तरुणींनी क्रांतीची ज्योत पेटविण्याचे काम केले. कल्पना दत्त, प्रितीलता वडडेदार, कनकलता बरुआ, बेगम हजरत महल, कित्तूर चेन्नम्मा, वेलू नचियार, अरुणा असफ अली, मातंगिनी हाजरा अशा अनेक स्त्रियांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान महत्वपूर्ण मानले जाते. ब्रिटिश सत्तेविरुध्द स्वातंत्र्य मिळवण्यासाठी या महिलांचे योगदान मोठे होते. स्वातंत्र्य चळवळीतील महिलांची भूमिका व सहभाग हा विशेष उल्लेखनीय होता.

- **स्त्री शिक्षण सामाजिक परिवर्तनाचे माध्यम:**

सामाजिक परिवर्तनामध्ये स्त्री शिक्षण महत्त्वपूर्ण मानले जाते. शिक्षणामुळे स्त्रियांच्या जीवनात आमुलाग्र बदल व विकास झाल्याचे दिसते. स्त्री शिक्षणामुळे महिलांमध्ये व्यक्तिमत्व विकास, जीवन मूल्यांची जाणीव आणि स्वतःचे स्थान निर्माण करण्याची क्षमता प्राप्त होते. शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये सकारात्मक बदल झालेले दिसतात. शिक्षण घेतलेल्या स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण, सामाजिक व राजकीय जाणीव, आर्थिक स्वावलंबन, विचार करण्याची क्षमता, आरोग्य पोषण व कुटुंब नियोजनाविषयी जागरूकता, कुटुंब कुटुंबातील निर्णय क्षमतेत वाढ इ. घटकांमध्ये सकारात्मक परिवर्तन झालेले दिसते. आज ग्रामीण व शहरी भागातील मुली शिक्षण घेऊन आपले नाव उज्वल करीत आहेत. स्त्रियांनी शिक्षण घेतल्यामुळे वैचारिक प्रबोधन होत आहे. सर्व जुन्या रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा मोडून काढण्याची ताकद स्त्रियांमध्ये आहे. त्यामुळे संपूर्ण कुटुंब आणि समाजामध्ये प्रगती होते. शिक्षण हे महिलांना आत्मनिर्भर बनवते. स्त्री समाजात समानता, जागरूकता, प्रगती आणते, स्त्री शिक्षणाचे महत्त्व अनमोल आहे. कारण ते स्त्रियांना स्वावलंबी बनवते. कुटुंब आणि समाजाच्या प्रगतीला हातभार लावते. स्त्री शिक्षणामुळे त्यांचे हक्क मिळविण्यास मदत होते. स्त्री शिक्षण हा समाजाच्या प्रगतीसाठी एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. यामुळे स्त्रियांचा सर्वांगीण विकास होतो. त्यांना सक्षम बनविते आणि कुटुंबाला व देशाला प्रगतीपथावर नेण्यास मदत करते. स्त्री शिक्षणामुळे निरक्षरता कमी होते आणि महिलांची स्वावलंबी जीवन जगण्याची उमेद वाढते. स्त्री शिक्षणाचा समाजावर सकारात्मक परिणाम होतो ज्यामुळे समाजात चांगले बदल घडतात.

- **सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनातील महिलांची भूमिका:**

महिलांनी अनेक चुकीच्या प्रथा परंपरावर आवाज उठविला. महिलांच्या नेतृत्वाखाली अनेक चळवळी आणि सामाजिक सुधारणा घडवून आल्या. स्त्री शिक्षणामुळे समाजातील सती प्रथेला विरोध झाला. विधवांच्या पुनर्विवाहाला चालना मिळाली.

बालविवाह प्रथेला विरोध करण्यात आला. मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. महिलांच्या उत्तम आरोग्यासाठी विशेष उपक्रम व शिबिरे राबविण्यात आली. संपूर्ण कुटुंबाला संस्कार देण्याचे कार्य स्त्रियाच करतात. कुटुंबातील पुढच्या पिढीची मानसिकता मूल्ये व विचारसरणी स्त्रियाच घडवितात.

आज महिलांनी सामाजिक सुधारणा चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. हुंडा प्रथा, बालविवाह, लैंगिक शोषण अशा सामाजिक समस्यांविरुध्द त्या आवाज उठवितात. महिला या कुटुंबाचा आधारस्तंभ आहेत आणि त्या कुटुंबाला आवश्यक असलेल्या बदलांशी जुळवून घेण्यास मदत करतात. महिला केवळ घरगुती जबाबदाऱ्याच सांभाळत नाहीत तर त्या उत्तम नेत्या, उद्योजिका आणि सामाजिक कार्यकर्त्या म्हणूनही काम करतात. अनेक महिलांनी सामाजिक कार्यामध्ये आपले विशेष योगदान दिले आहे. थोडक्यात महिलांनी सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनात अनेक महत्त्वपूर्ण आणि बहुआयामी भूमिका बजावली आहे आणि त्यांची ही भूमिका भविष्यातही अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

- **आरोग्य क्षेत्रातील महिलांचे योगदान:**

अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स, नर्स, डॉक्टर, समाज कार्यकर्त्या यांच्या योगदानामुळे आरोग्य व्यव स्थेत मोठी सुधारणा झाली आहे. पोषण, गर्भवती स्त्रियांचे आरोग्य, बालसंगोपन, प्रौढ आरोग्य आणि आरोग्य प्रतिबंधक उपाय यांची माहिती समाजात पोहोचविण्यास महिलांनी मोलाची भूमिका बजावली आहे. कोविड-19 महामारीच्या काळामध्ये जगभरामध्ये महिलांनी मोलाची भूमिका बजावलेली सर्वांनी अनुभवली आहे. माता आणि बाल आरोग्याच्या क्षेत्रात महिलांनी आरोग्य सेवा तळागाळापर्यंत पोहोचवली आहे. भारतातील  पहिल्या महिला डॉ. आनंदीबाई गोपाळ जोशी यांनी वैद्यकीय क्षेत्रात महिलांच्या योगदानाचा पाया रचला. महिलांचे योगदान केवळ सेवा पुरविण्याइतके मर्यादित नसून ते आरोग्य, धोरण, नेतृत्व आणि आरोग्य प्रणालीच्या एकूण विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात.

- **आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानातील महिलांचे योगदान:**

आज महिला तंत्रज्ञानाचा वापर करून समाजाला नवी दिशा देताना दिसत आहेत. माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दिमत्ता (AI), Data Science, अवकाश संशोधन, बायोटेक्नॉलॉजी, ई-कॉमर्स उद्योग अशा अनेक क्षेत्रात महिलांच्या प्रगतीमुळे समाजातील आधुनिक विचार, नवकल्पना आणि प्रगतीचा वेग वाढला आहे.

आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानात महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामध्ये अनेक क्षेत्रांचा समावेश होतो. अवकाश संशोधन, संगणक क्षेत्र आणि वैद्यकीय क्षेत्रामध्ये महिलांनी भरारी घेतली आहे. भारतामध्ये डॉ. टेसी थॉमस, (क्षेपणास्त्र) रितू करिधल, (अंतराळ) डॉ. आनंदीबाई जोशी, (वैद्यकीय) व कमला सोहनी (भारतीय विज्ञान संस्था) यांसारख्या अनेक महिलांनी योगदान दिले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये महिलांच्या योगदानाची दखल घेणे आणि त्यांचे कौतुक करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे अधिक महिलांना या क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा मिळते.

- **सामाजिक परिवर्तनाचा पाया - महिला सक्षमीकरण:**

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलेला स्वातंत्र्य, संधी, सुरक्षितता, कायदेशीर संरक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि निर्णयक्षमतेचा अधिकार देणे होय. शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, समान कायदे, सामाजिक सुरक्षा, आरोग्य सुविधा, स्वतंत्र विचार हे सक्षमीकरणाचे प्रमुख घटक आहेत. महिला सक्षम झाली की ती कुटुंब समाज आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची शक्ती बनते. म्हणून महिला सक्षमीकरण हा सामाजिक परिवर्तनाचा पाया आहे. महिलांना समान संधी व अधिकार मिळवून देणे हे महत्त्वाचे आहे. स्त्री - पुरुष समानता प्रस्थापित करणे, महिलांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे आणि त्यांच्या विकासासाठी समान संधी उपलब्ध करून देणे या गोष्टींचा समावेश सक्षमीकरणात होतो. महिलांच्या सक्षमीकरणामुळे समाजात सकारात्मक बदल घडतात. यामुळे महिलांचा वैयक्तिक व सामूहिक विकास होतो. स्त्री पुरुष समानतेवर आधारित समाजरचना तयार होते. महिला बचत गट व व्यावसायिक प्रशिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा भाग आहे.

- **महिलांसमोरील आव्हाने:**

आजच्या घडीला जरी सामाजिक परिवर्तन घडत असले तरी, महिलांना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये

लैंगिक भेदभाव, घरगुती हिंसा, शिक्षणातील असमानता, सुरक्षिततेचा अभाव, पितृसत्ताक मानसिकता, आरोग्य पोषणातील कमतरता, आर्थिक संधीची मर्यादा या घटकांचा समावेश होतो. ही सर्व आव्हाने कमी झाली तर महिलांचे योगदान अधिक प्रभावी दिसेल. सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल.

- **निष्कर्ष:**

महिलांनी इतिहासापासून आजपर्यंत समाजातील अनेक परिवर्तन कार्य भूमिकांमध्ये स्वतःला सिध्द केले आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य तांत्रिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात महिलांनी घडवलेले योगदान समाजाला अधिक संवेदनशील, जागरूक आणि प्रगत बनवते.

स्त्री फक्त कुटुंबाची आधारस्तंभ नसून समाजाची परिवर्तन वाहक आहे. तिच्या प्रगतीशिवाय समाजाचा विकास अपूर्ण आहे. म्हणून सामाजिक परिवर्तनाचा खरा केंद्रबिंदू महिला आहे आणि तिचे सक्षमीकरण म्हणजे समाजाच्या उज्वल भविष्याची गुरुकिल्ली आहे.

- **संदर्भग्रंथसूची:**

१. जोगळेकर शांता, भारतातील स्त्री - स्थिती प्रश्न आणि वाटचाल सौरभ प्रकाशन, पुणे
२. देशमुख प्रभाकर, स्त्री आणि समाज सुयश प्रकाशन, पुणे
३. ब्रह्मे सुलभा, स्त्रिया आणि समाज सुयश प्रकाशन, पुणे
४. परांजपे इंदिरा स्त्री-पुरुष समानता आव्हाने आणि वास्तव कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
५. भगवंत नीलिमा, स्त्री सक्षमीकरण आणि सामाजिक बदल अमेय प्रकाशन, मुंबई
६. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, सावित्रीबाई फुले चरित्र, महाराष्ट्र शासन प्रकाशन
७. maharashtra.gov.in महिला व बालविकास विभागाचे मराठी दस्तऐवज
८. E - Pratishthan (ई - प्रतिष्ठान) समाजशास्त्र व स्त्री अध्ययन विषयक मराठी संशोधन लेख.